प्रेस नोट

दिनांक :– १९/०१/२०२२

**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, रायगड भवन, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील लोकसेवक श्री. कल्याण उत्तम पाटील, वय–५७ वर्षे, कार्यकारी अभियंता (पी.पी.ॲन्ड क्यु) (वर्ग–१), यांस लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे पथकाने ताब्यात घेतलेबाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. कल्याण उत्तम पाटील, वय–५७ वर्षे, कार्यकारी अभियंता (पी.पी.ॲन्ड क्यु) (वर्ग–१), शहर व औद्योगिक विकास महामंडळ, रायगड भवन, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई. |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ३,००,०००/– रुपये. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०,०००/– रुपये. |
| थोडक्यात हकिकत | दिनांक १८/०१/२०२२ रोजी वरील नमूद लोकसेवक यांचेविरुद्ध तक्रारदार यांनी केलेले त्यांचे प्रलंबित कामाची एकुण ६ बिले मंजूर करण्यासाठी ३,००,०००/– रु. लाचेची मागणी करुन यापुर्वी १,२०,०००/– रु. स्विकारले असलेबाबत लेखी तक्रार दिली होती.<br>त्या अनुषंगाने दिनांक १९/०१/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी तक्रारदार यांची केलेली कामे (ब्रिज पेंटींग व खारघर रेल्वे स्टेशन परिसर तसेच स्कायवॉकचे सॅनिटायझेशन) अशा एकुण ६ बिलांपैकी पहिली ३ बिले मंजूर करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे पहिल्या ३ बिलांची राहिलेली उर्वरित रक्कम ३०,०००/–रु. लाचेच्या रक्कमेची मागणी केली व बाकी ३ बिलांचे नंतर पाहू असे सांगून, ३०,०००/– रु. लाचेची रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीअंती निष्पन्न झाले.<br>त्या अनुषंगाने आज दिनांक १९/०१/२०२२ रोजी सापळा कारवाई आयोजित केली असता, एम.जी.एम हॉस्पीटलचे पाठीमागे गेटचे समोर सीबीडी, नवी मुंबई येथे लोकसेवक कल्याण पाटील यांनी त्यांचे स्वत:चे नांवे असलेले चारचाकी वाहन क्रमांक MH-46-P-2456 मध्ये तक्रारदार यांचेकडून ३०,०००/– रु. लाचेच्या रकमेचा स्विकार केला असता, त्यांना १३:२२ वा. ला.प्र.वि., ठाणे पथकाकडून रंगेहात पकडण्यात आले. |

पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

**मार्गदर्शन अधिकारी:–मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले सो.,पोलीस अधीक्षक,ला.प्र.वि,ठाणे परिक्षेत्र,ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– ला.प्र.वि.ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in
<u>ऑनलाईन तक्रार</u>
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नंबर :– १०६४.
दुरध्वनी क्रमांक :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९.
व्हॉटस् ॲप क्रमांक :– ९९३०९९७७००.

MPrajapati

**(मनोजकुमार प्रजापती)**
**पोलीस निरीक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे**